Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
2654 3214
Extn. : 3214

University of Mumbai

Enrolment Section
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in

No. Enrol./ 628 of 2017
Date : 25/07/2017

## परिपत्रक -२

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था.

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देताना, नावनोंदणी अर्ज विद्यापीठाकडे पाठविताना त्रुटी राहु नयेत व महाविद्यालयांना असुविधा होवू नये या अनुषंगाने नावनोंदणी विभागाच्या सुचना कळविण्यात येत आहेत.

**नावनोंदणी अर्ज विद्यापीठात सादर करताना महाविद्यालयांसाठी आवश्यक सुचना खालीलप्रमाणे**

१) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज विद्यापीठात सादर करताना ते खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे नावांची यादी Alphabetically सादर करावी (List Should be Vertically).

| Sr. No. | Application Form Number | Name of the Student | Percentage | Cast | Remark |
|---|---|---|---|---|---|

---

**अभियांत्रिकी (Engineering) महाविद्यालयांसाठी तक्ता खालीलप्रमाणे :-**

| Sr. No. | Application Form Number | Name of the Student | Branch | Percentage | Cast | Remark |
|---|---|---|---|---|---|---|

२) विद्यार्थ्यांचे अर्ज विद्याशाखा व कोर्सनुसार वेगवेगळे केलेले असावेत. वेगळी नावांची यादी असावी. एकत्र आणलेले अर्ज स्विकारले जाणार नाही, त्याचप्रमाणे विद्याशाखा व कोर्सनुसार Eligibility Status Report जमा करावे.

३) विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी अर्जासोबत विद्याशाखा व कोर्सनुसार (B.A., B.Com., B.Sc. व इतर कोर्सेस) नावांच्या याद्या प्रत्येकी तीन प्रतित सादर कराव्यात.

४) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज सादर करतेवेळी विद्यार्थ्यांचे मुळ गुणपत्रक, जातीचे प्रमाणपत्र व इतर दस्तावेज यांच्या छायांकित प्रतीवर महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे सांक्षाकित असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अर्जावर विद्यार्थ्याची सही असणे देखील आवश्यक आहे.

५) सर्व कोर्सेस Online झालेले असून त्यांच्या अर्जासोबत एकच N.F.T द्वारा भरलेल्या फीची पावती असेल तर प्रत्येक विद्याशाखा / कोर्सनुसार त्याच्या झेरॉक्स लावाव्यात.

..२/-

Scanned by CamScanner

Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
2654 3214
Extn. : 3214

University of Mumbai

Enrolment Section
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in
No. Enrol./
Date :_______________ 20



६) महाविद्यालयांनी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या तारखेलाच नावनोंदणी अर्ज सादर करावेत त्यामुळे गर्दी होणार नाही व आपले अर्ज वेळेत स्विकारता येतील.

७) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी विद्याशाखा, शिक्षणक्रम, तुकड्या व इतर वाढीव विद्यार्थी संख्या यांची मान्यता मिळाली असलेल्या सर्व संलग्नता विभागाची मान्यतेची पत्रे व महाराष्ट्र शासनाची पत्रे नावनोंदणी विभागात सादर करणे आवश्यक आहे.

८) प्रत्येक महाविद्यालयाने अर्ज सादर करताना पात्रतेसाठी आवश्यक असणारे दस्ताऐवज अर्जासोबत लावावेत. ब-याचदा असे निदर्शनास आले की, विद्यार्थ्याचा अर्ज आहे परंतू. त्याची गुणपत्रिका नाही त्याचे जातीचे प्रमाणपत्रच नाही असे होता कामा नये. असे अर्ज ताबडतोब अपात्र (Not Eligible) केले जातील. याची महाविद्यालयाने नोंद घ्यावी. अभियांत्रिकी, फार्मासी, आर्किटेक्चर, विधी व बी.एड. विषयांचे अर्ज जमा करताना महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे CET Score Card आणि Allotment Letter लावणे आवश्यक आहे त्याशिवाय अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

९) काही कारणास्तव एखादा अर्ज Pending राहिला तरी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे महाविद्यालयाने १५ दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. जर १५ दिवसांत कागदपत्रे जमा केली नाहीत तर त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द समजण्यात येईल.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन नावनोंदणी, प्रक्रिया वेळेत होण्याकरिता सर्व महाविद्यालयांनी खालील वेळापत्रकानुसार पुढील कार्यवाही करावी. महाविद्यालयांना विनंती करण्यात येते कि अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावीत अन्यथा अर्ज स्वीकारले जाणार नाहित.



Scanned by CamScanner

Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
2654 3214

Extn. : 3214

University of Mumbai

Enrolment Section
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in

No. Enrol./
Date :________________ 20



| Region | From | To |
|---|---|---|
| Mumbai | 1st August 2017 | 5th August 2017 |
| Thane | 7th August 2017 | 11th August 2017 |
| Palghar, | 11th August 2017 | 19th August 2017 |
| Raigad | 21st August 2017 | 24th August 2017 |
| Ratnagiri, Sindhudurg, Nashik & Pune | 28th August 2017 | 31st August 2017 |

टिपणी :- १) अध्यादेश क. ११४-अ नुसार महाविद्यालयांना दिनांक १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या मुदतीत मिळालेल्या प्रत्येक अर्जाच्या बाबतीत रू. १५०/- एवढे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

२) अध्यादेश क. ११४-अ नुसार महाविद्यालयांना दिनांक १ आक्टोबर ते ३१ डिसेंबर या मुदतीत येणारे नावनोंदणीचे अर्ज हे कुलगुरूंच्या विशेष परवानगीने प्रत्येक अर्जामागे रू. २००/- एवढे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

३) ज्यांनी ३१ डिसेंबर रोजी किंवा त्यापूर्वी आपल्या महाविद्यालयांमार्फत विद्यापीठाकडे आपले नाव नोंदणी अर्ज सादर केले नसतील अशा उमेद्वारांना दिलेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

स्थानापन्न उपकुलसचिव
(नावनोंदणी विभाग)

Scanned by CamScanner